MHSC17000232025

A.B.N.No.232/2025

सादर दिनांक : १७-११-२०२५
नोंदणी दिनांक : १७-११-२०२५
निर्णय दिनांक : २४-०३-२०२६
कालावधी : वर्ष ०० महिने ०४ दिवस ०८

**कोर्ट विदयमान न्यायाधीश, सहकार न्यायालय, श्रीरामपूर**
(पीठासीन अधिकारी श्वेता वि.मोरे पाटील )

ल.मु.नं.२३२/२०२५.
निशाणी क्र.२४.

वादी : राहाता पिपल्स नागरी सहकारी
पतसंस्था मर्यादित, राहाता
तर्फे व करिता व्यवस्थापक,
श्री. पुरुषोत्तम दादासाहेब गुंजाळ
वय-५२ वर्षे, धंदा- नोकरी,
मु.पो. राहाता, ता.राहाता
जि.अहमदनगर

*विरुध्द*

प्रतिवादी : १. संगिता प्रशांत वाघ
वय-३८ वर्षे, धंदा- व्यापार
रा.वाघ वस्ती,एकरुखे,ता.राहाता, जि.अहिल्यानगर
२. श्री.गणेश बाबुराव थोरात
वय-४५वर्षे, धंदा- व्यापार
रा.पुणतांबा रस्ता,राजवाडा,एकरुखे,
ता.राहाता, जि. अहिल्यानगर
३. श्री.संदिप भाऊसाहेब पुंड
वय-४० वर्षे, धंदा- नोकरी
रा.जेजुरकर वस्ती,निर्मळ पिंप्री रोड,अस्तगांव,
ता.राहाता, जि. अहिल्यानगर
४. परिगाबाई सयराम खळदकर
वय-६० वर्षे, धंदा- शेती
रा.एकरुखे,ता.राहाता, जि. अहिल्यानगर
ह.मु.रामपुर,ता.राहुरी,जिल्हा अ.नगर

न्यायाधीश,सहकार न्यायालय नं.३ * श्रीरामपूर *

**विवाद : रक्कम रुपये ६,५६,३१२/- वसुलीसाठी**

A

MHSC17000232025

वादी तर्फे वकील : श्री.अमोल एम. सदाफळ

प्रतिवादी क्र. १ ते ४ : एकतर्फा

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक २४/०३/२०२६)

१. प्रस्तुत विवाद रक्कम रुपये ६,५६,३१२/- वसुलीसाठी व त्यावर द.सा.द.शे. १६ टक्के भविष्य व्याज व दंडव्याज २ टक्के प्रमाणे दर तिमाही होणारे व्याजासह रक्कम मंजूर होऊन मिळणेकामी दाखल केला आहे.

### विवादातील कथन खालील प्रमाणे

२. वादी संस्थेची केस अशी की, वादी संस्था महाराष्ट्र सहकार कायदा, १९६० अन्वये नोंदणीकृत आहे. वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ यास रुपये ५,००,०००/- चे कर्ज मंजूर करुन वाटप केले. सदर कर्जास प्रतिवादी क्रमांक २ ते ४ हे जामीनदार राहिले. प्रतिवादींनी कर्जापोटी वादी संस्थेच्या लाभात फिक्स कर्जरोखा, वचनचिठ्ठी, व आम्ही जामीनदार इत्यादि आवश्यक दस्त करुन दिले. कर्जाची परतफेड द.सा.द.शे. १६ टक्के व्याजदराने दर तीन महिन्यांनी व्याजाची आकारणी करावयाची होती. तसेच व्याज व कर्ज थकल्यापासून थकलेल्या रक्कमेवर द.सा.द.शे. २ टक्के प्रमाणे दंडव्याज आकारावयाचे होते. प्रतिवादी क्र.१ ने ठरल्याप्रमाणे कर्ज रक्कमेची परतफेड केली नाही. प्रतिवादी क्र.१ कडे खाते उता-यानुसार दिनांक २७/०२/२०२५ अखेर विवाद रक्कम रुपये ६,५६,३१२/- येणेबाकी आहे. वादी संस्थेने प्रतिवादींना अनेकवेळा कर्ज रक्कमेची परतफेडीची मागणी केली. परंतु प्रतिवादीने कर्जाची परतफेड केली नाही. वादी संस्थेच्या मते विषयांकित कर्ज रक्कम परतफेडीची सर्व प्रतिवादींची वैयक्तिक व संयुक्तिक जबाबदारी आहे. वरील सर्व मुद्यांच्या आधारावर वादी संस्थेने विवादाचा निवाडा मागणीप्रमाणे तिचे लाभात पारीत करावा अशी विनंती केलेली आहे.

३. संचिकेचे अवलोकन करता, विवादाची नोटीस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना तामिल होऊनही ते विवादात गैरहजर राहिले. त्यामुळे विवाद प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द 'एकतर्फा' चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

न्यायाधीश, सहकार न्यायालय नं. ३ ★ श्रीरामपूर ★

४. विवादाची मागणी सिध्द करणेकामी वादी संस्थेतर्फे नि. १३ कडील श्री. पुरुषोत्तम दादासाहेब गुंजाळ यांचा पुरावा सादर करण्यात आलेला आहे. तर विवादाचे पृष्ठयर्थ वादीने नि. ३ चे दस्त यादीसोबत कागदपत्रे सादर केलेली आहेत. नि. २३ नुसार वादी संस्थेने तिचा पुरावा बंद घोषित केलेला आहे.

५. वादी वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.विवादात दाखल दस्तऐवजांचे अवलोकन करण्यांत आले.

६. विवादात दाखल नि.१४ वरील संचालक मंडळाची ठराव क्र. ६ ची सत्यप्रत, नि.१५ वरील फिक्स कर्जरोखा,नि. १६ वरील आम्ही जामीनदार व नि. १७ वरील वचन चिठ्ठी, इत्यादि आहेत. सदर दस्त विवादीत कर्ज संबंधाने असून त्यावर प्रतिवादींच्या सहया व अंगठे आहेत. नि.१३ कडील वादी साक्षीदार यांचा पुरावा विवादातील कथनाशी सुसंगत असा आहे. त्याचे साक्षीस प्रतिवादीतर्फे आवाहन देण्यात आलेले नाही. नि. १५ वरील फिक्स कर्जरोखा व नि. १७ वरील वचनचिठ्ठी नुसार कर्जाचा मान्य व्याजदर द.सा.द.शे. १६ टक्के इतका आहे. त्यामुळे वादी द.सा.द.शे. १६ टक्के दराने व्याजाप्रमाणे वसुल करण्यास वादीस अधिकार आहे. नि. १८ वरील खाते उतारा पाहता, प्रतिवादी क्र.१ कडे दिनांक २७/०२/२०२५ विवाद रक्कम रुपये ६,५६,३१२/- येणे बाकी दर्शविलेली आहे.

७. वरील सर्व दस्तांचे हजेरीत वादी साक्षीदाराची साक्षी ही स्विकृत होणेस पात्र अशी आहे.

८. सबब वरील सर्व चर्चा, विवादात दाखल उपरोक्त दस्त व वादी साक्षीदाराची निर्विवाद साक्ष विचारात घेता, मी असे गृहीत धरले की, प्रतिवादी क्र.१ यानी वादी संस्थेकडून रुपये ५,००,०००/- चे कर्ज उचल केले व त्यास प्रतिवादी क्र. २ ते ४ जामीनदार राहिले व प्रतिवादींनी उपरोक्त दस्त वादीचे लाभात करुन दिले.

९. दावा रक्कमेबाबत वादीचा वर नमुद तोंडी, लेखी पुरावा व खाते उतारा तपासला असता वादींनी प्रत्यक्ष भेटीची नोटीस, विमा व दंडव्याज अशा अवास्तव व योग्य पुराव्या अभावी अयोग्य रक्कमा रुपये १५,६१९/- इतक्या प्रतिवादींवर लादल्या आहेत.सबब त्या रक्कमा वजा जाता उर्वरित रक्कम रुपये ६,४०,६९३/- शाबित केले आहेत.तसेच वचनचिठ्ठी/कर्जरोखा प्रमाणे वादी द.सा.द.शे १६%

न्यायाधीश, सहकार न्यायालय नं. ३ श्रीरामपूर

प्रमाणे दिनांक २८/०२/२०२५ पासून पुढे व्याज घेणेस पात्र आहे. परंतु वादी संस्था दंडव्याज घेण्यास पात्र नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **सेंट्रल बँक ऑफ इंडिया विरुध्द रविंद्र व इतर AIR 2001 Supreme Court 3095** या निवाडयात परिच्छेद ४४ मध्ये खालील प्रमाणे निरिक्षण नोंदवले आहे.

"44. We are of the opinion that the meaning assigned to the expression "the principal sum adjudged" should continue to be assigned to "principal sum" at such other places in Section 34(1) where the expression has been used qualified by the adjective "such", that is to say, as "such principal sum". Recognition of the method of capitalisation of interest so as to make it a part of the principal consistently with the contract between the parties or established banking practice does not offend the sense of reason, justice and equity. As we have noticed, such a system has a long-established practice and a series of judicial precedents upholding the same. Secondly, the underlying principle as noticed in several decided cases is that when interest is debited to the account of the borrower on periodical rests, it is debited because of it having fallen due on that day. Nothing prevents the borrower from paying the amount of interest on the date it falls due. If the amount of interest is paid there will be no occasion for capitalising the amount of interest and converting it into principal. If the interest is not paid on the date due, from that date the creditor is deprived of such use of the money which it would have made if the debtor had paid the amount of interest on the date due. The creditor needs to be compensated for deprivation. As held in *Pazhaniappa Mudaliar* v. *Narayana Ayyar* [AIR 1943 Mad 157 : (1942) 2 MLJ 753] the fact situation is analogous to one as if the creditor has advanced money to the borrower equivalent to the amount of interest debited. We are, therefore, of the opinion that the expression "the principal sum adjudged" may include the amount of interest, charged on periodical rests, and capitalised with the principal sum actually advanced, so as to become an amalgam of principal in such cases where it is permissible or obligatory for the court to hold so. Where the principal sum (on the date of suit) has been so adjudged, the same shall be treated as "principal sum" for

न्यायाधीश, सहकार न्यायालय नं.३ श्रीरामपूर

the purpose of "such principal sum" — the expression employed later in Section 34 CPC. The expression "principal sum" cannot be given different meanings at different places in the language of same section i.e. Section 34 CPC."

सदर निरीक्षणानुसार व्याजाची रक्कम देय दिनांकास परतफेड न झाल्यास ती रक्कम मुद्दल मध्ये समाविष्ट करुन त्यावर व्याज घेण्यास वादी संस्था पात्र ठरते.

१०. वरील सर्व चर्चा विचारात घेता, मी या निर्णयाप्रत आले आहे की, वादी बँकेचा विवाद खर्चासह अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) वादी संस्थेचा विवाद खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रमांक १ ते ४ ला आदेशित करण्यांत येते की, प्रतिवादींनी विवाद रक्कम रुपये ६,४०,६९३/- इतक्या मुद्दल रक्कमेवर द.सा.द.शे. १६% प्रमाणे दरतिमाही व्याजदराने दिनांक २८/०२/२०२५ पासून ते रक्कमेची पूर्ण परतफेड होईपावेतो होणारी सर्व रक्कम वादी संस्थेस वैयक्तिक व संयुक्तिकरित्या परतफेड करावी.

३) प्रतिवादींनी वादींना दाव्याच्या खर्चाची रक्कम द्यावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

४) येणे प्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.

(न्यायदान कक्षात घोषित.)

न्यायाधीश, सहकार न्यायालय नं. ३ श्रीरामपूर

Shweta 24/03/26

(श्वेता वि.मोरे पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, श्रीरामपूर

ठिकाण : श्रीरामपूर
दिनांक : २४/०३/२०२६

निवाडा घोषित दिनांक : २४/०३/२०२६
निवाडा तयार दिनांक : २४/०३/२०२६
निवाडा स्वाक्षरी दिनांक: २४/०३/२०२६

MHSC17000232025

A.B.N.No.232/2025

सादर दिनांक : १७-११-२०२५
नोंदणी दिनांक : १७-११-२०२५
निर्णय दिनांक : २४-०३-२०२६
कालावधी : वर्षे ०० महिने ०४ दिवस ०८

## कोर्ट विदयमान न्यायाधीश, सहकार न्यायालय, श्रीरामपूर

(पीठासीन अधिकारी श्वेता वि.मोरे पाटील)

ल.मु.नं.२३२/२०२५.
निशाणी क्र.२५.

वादी : राहाता पिपल्स नागरी सहकारी
पतसंस्था मर्यादित, राहाता
तर्फे व करिता व्यवस्थापक,
श्री. पुरुषोत्तम दादासाहेब गुंजाळ
वय-५२ वर्षे, धंदा- नोकरी,
मु.पो. राहाता, ता.राहाता
जि.अहमदनगर

*विरुध्द*

प्रतिवादी : १. संगिता प्रशांत वाघ
वय-३८ वर्षे, धंदा- व्यापार
रा.वाघ वस्ती,एकरुखे,ता.राहाता, जि.अहिल्यानगर
२. श्री.गणेश बाबुराव थोरात
वय-४५वर्षे, धंदा- व्यापार
रा.पुणतांबा रस्ता,राजवाडा,एकरुखे,
ता.राहाता, जि. अहिल्यानगर
३. श्री.संदिप भाऊसाहेब पुंड
वय-४० वर्षे, धंदा- नोकरी
रा.जेजुरकर वस्ती,निर्मळ पिंप्री रोड,अस्तगांव,
ता.राहाता, जि. अहिल्यानगर
४. परिगाबाई सयराम खळदकर
वय-६० वर्षे, धंदा- शेती
रा.एकरुखे,ता.राहाता, जि. अहिल्यानगर
ह.मु.रामपुर,ता.राहुरी,जिल्हा अ.नगर
ता.राहाता, जि. अहिल्यानगर

न्यायाधीश, सहकार न्यायालय नं.३ * श्रीरामपूर *

**विवाद : रक्कम रुपये ६,५६,३१२/- वसुलीसाठी**

ज्याअर्थी १९६१ चा कायदा कलम २४ चे कलम ९१ अन्वये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वरील दाव्याचे कारण झाल्यावरुन निकाल करण्याचे आहे.

त्याअर्थी मी, श्वेता वि.मोरे पाटील, न्यायाधीश, सहकार न्यायालय, श्रीरामपूर वरील पक्षकारास समन्से करुन आणि दाव्याची योग्य चौकशी अलहिदा नोंदवून ठेवलेल्या कारणावरुन असे कळवितो की,

## निवाडा

१) वादी संस्थेचा विवाद खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रमांक १ ते ४ ला आदेशित करण्यांत येते की, प्रतिवादींनी विवाद रक्कम रुपये ६,४०,६९३/- इतक्या मुद्दल रक्कमेवर द.सा.द.शे. १६% प्रमाणे दरतिमाही व्याजदराने दिनांक २८/०२/२०२५ पासून ते रक्कमेची पूर्ण परतफेड होईपावेतो होणारी सर्व रक्कम वादी संस्थेस वैयक्तिक व संयुक्तिकरित्या परतफेड करावी.

३) प्रतिवादींनी वादींना दाव्याच्या खर्चाची रक्कम द्यावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

### विवाद खर्च

| तपशिल | कोर्ट फी स्टॅम्प | अनामत (डिपॉझीट) | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| वादी | ६,७९०/- | -- | -- | ६,७९०/- |

(श्वेता वि.मोरे पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, श्रीरामपूर

ठिकाण : श्रीरामपूर
दिनांक : २४/०३/२०२६

निवाडा घोषित दिनांक : २४/०३/२०२६
निवाडा तयार दिनांक : २४/०३/२०२६
निवाडा स्वाक्षरी दिनांक: २४/०३/२०२६